## निशाणी क्र. २२४ वरील आदेश

प्रतिवादी क्र. २ चे वारस २अ ते २ड यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत स्वीकारणेस परवानगी मिळणेसाठी दखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. २ चे वारस हे वयोवृध्द असून ते वेगवेगळया ठिकाणी राहत असून त्या महिला असलेने त्यांना दाव्याचे अनुषंगाने काही माहिती व कागदपत्रे मुदतीत उपलब्ध न झालेने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता न आल्याने प्रतिवादींविरुद्ध विना कैफियत आदेश झालेला आहे. प्रस्तूतचा दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांची कैफियत मांडणेची  संधी न मिळाल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. विलंब माफ केल्यास वादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब प्रतिवादीं विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

२. वादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जातील कथन त्यांना मान्य व कबूल नाही. अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सदर प्रतिवादींना दाव्याचे समन्स दिनांक ०६/०२/२०१९ व ०८/०२/२०१९ ला मिळाले आहेत. त्यानंतर दाव्याची ता. १२/०२/२०१९, १२/०३/२०१९, ०२/०४/२०१९ व ०२/०५/२०१९ अशा तारखा नेमण्यात आल्या. परंतू प्रतिवादींनी सदर तारखांना कैफियत दिली नाही. याबाबत कोणतेही संयुक्तिक कायदेशीर कारण दिलेले नाही. सबब प्रस्तूतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादींनी केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादीं तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा हा स्थावर मिळकतीच्या वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे.

न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच न्यायलयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासरखे होणार आहे. त्यामुळे त्यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादींनी वादींना खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते.

५. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी रुपये ५००/– (रु. पाचशे फक्त ) खर्चाची रक्कम जमा करावी, यापैकी त्यांनी रुपये २५०/– (रु. दोनशे पन्नास फक्त ) वादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रतिवादींनी वरील पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेत येते.

Girish Sudarshan Mane

Digitally signed by Girish Sudarshan Mane
DN: cn=Girish Sudarshan Mane, ou=Judiciary, o=Bombay High Court, st=Maharashtra, c=IN
Date: 2019.08.15 10:12:03 +0530

स्थळ : कोरेगाव

दिनांक : १३/०८/२०१९

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.